

# NSS Activities

## Constitution Day (26 November 2022)







GPS Map Camera
Alibag, Maharashtra, India
MV7R+9MG, Gondhalpada, Varasoli, Alibag,
Maharashtra 402201, India
Lat 18.663357°
Long 72.890981°
26/11/22 09:07 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Alibag, Maharashtra, India
MV7R+9MG, Gondhalpada, Varasoli, Alibag,
Maharashtra 402201, India
Lat 18.663356°
Long 72.890989°
26/11/22 09:16 AM GMT +05:30
Google

# Tree plantation ( 7 July 2021)






# National Voter's Day Celebration

# (25 January 2021)





# National Service scheme Orientation

# (06 September 2018 )






# Alibag Beach Cleaning

# (17 September 2022)






# Tree Plantation (5 June 2021)











# Award Distrubution (14 February 2022)





# Residential Camp ( December 2022)









POCO X3 | ANISH

# Tree Plantation (8 July 2022)













**Tree Plantation (10 June 2017)**



# Celebration Of Yoga Day

**(21 June 2017)**








**Swachatta Abhiyan (College  Campus )**

**(2 October 2017 )**



**Swachatta Abhiyan (Alibag Beach)**

**(2 October 2017)**





# Celebration Of Republic Day

# (26 January 2017)



# Residential Camp (December 2017)











**Yoga Day (21 June 2018)**






SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA

# International Yoga Day (21 June 2019)









# Organ Donation Awareness( 09 Aug 2017)

# अवयवदान सर्वश्रेष्ठ दान

## डॉ. चंद्रशेखर साठये यांचे प्रतिपादन



अवयव दानाविषयी मार्गदर्शन करताना अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर साठये. यावेळी डॉ. प्रमोद कुमठेकर, डॉ. दीपक गोसावी, प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक आदी उपस्थित होते.

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अवयव दान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. ज्याद्वारे आपण मृत्यूनंतर आपले अवयव दान करून अंतिम स्वरूपी ज्यांचे अवयव निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांना अवयव दान करू शकतो. अनेक रुग्णांना अवयव दान हा एक आशेचा किरण आहे, असे प्रतिपादन अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर साठये यांनी केले.

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञानमहाविद्यालय वेश्वी-अलिबाग, एनएसएस विभाग, जिल्हा रुग्णालय, रोटरी क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पीएनपी संकुल सभागृहात, चला अवयवदान करू या! जीवनदान देऊ या! जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला होता. याप्रसंगी डॉ. चंद्रशेखर साठये बोलत होते. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमठेकर, सचिव डॉ. दीपक गोसावी, सदस्य डॉ. निलेश म्हात्रे, पीएनपी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, प्रा. रवींद्र पाटील, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आदी उपस्थित होते.

मृत्यूपश्चात अवयव दानाची कोणाची इच्छा असेल तर सर्वप्रथम ती प्रकट करावी लागेल, ती लिखित स्वरूपात दस्तावेजाच्या रुपात करून ठेवावी लागेल. जवळचे नातेवाईक/ मृत्यूपश्चात उत्तराधिकारी आहेत. यांनाही अवयव दानाची जिवंतपणी कल्पना द्यावी लागेल. कोणीही १८ वर्षांवरील सज्ञान व्यक्ती स्वतःचे अवयव मृत्यूपश्चात दान करण्यासाठी अशी इच्छा प्रकट करू शकतो, ते दस्तावेज बनवू शकते व ती व्यक्ती अवयवदाता बनू शकते. अवयव विकले किंवा खरीदले जाऊ शकत नाहीत. या कायद्यान्वये ज्यांना अवयवांची गरज आहे, अशांची एक मध्यवर्ती यादी केली जाते व या यादीत वय, रक्तगट, प्रत्यारोपणाची निकड, नोंदणीची तारीख याबाबतीत विविध गुण देऊन अवयवदाता व गरजू रुग्ण यांची गुणात्मक सांगड घातली जाते. व सर्वाधिक गुण जुळणाऱ्या रुग्णास असे अवयव दिले जातात. ही सर्व प्रक्रिया पारदर्शक असून, यात कोणताही अर्थव्यवहार होत नाही, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

इच्छुक असणाऱ्यांसाठी ही सर्व माहिती घरबसल्या ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळात www.giftlife.co.in या संकेतस्थळाला भेट देऊन भरता येऊ शकते व अवयवदानासाठी नोंदणी करू शकतो. या वेळेत या संकेतस्थळावर लॉग इन होऊन आपण एक फॉर्म भरायचा आहे. यात आपली वैयक्तिक माहिती नाव, जन्मतारीख, पत्ता, मोबाईल क्रमांक आदी भरावे लागेल. तसेच आपण कोणते अवयव दान करू इच्छिता (उदा. किडनी, हृदय वगैरे) याचे पर्याय भरावे लागतील. यामध्ये आपला एक फोटो ओळखपत्र (उदा. पॅनकार्ड किंवा आधारकार्ड) स्कॅन करून या संकेतस्थळावर अपलोड करावे लागेल. तसेच आपल्या नातेवाईक- उत्तराधिकाऱ्यांचीही माहिती यात भरावी लागेल.

**Guru Paurnima Celebration (27 July  2018)**






# “Swacchata Sarvekshan & Swacchata Abhiyan Rally

## 8 Octomber 2018



रायगड टाइम्स

जिल्हा

# स्वच्छतारुपी सौंदर्याची आराधना करा

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. साळुंखे यांचे आवाहन

पी. एम. साळुंखे पुढे मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना ओला व सुका कचरा म्हणजे काय? त्याच्या व्यवस्थापनाविषयी सविस्तर मार्गदर्शन, परिसरातील ओल्या व सुक्या कचऱ्याची योग्य पध्दतीने हाताळणी, कचऱ्यापासून तयार होणाऱ्या खताचा वापर परसबागेसाठी कशाप्रकारे करता येऊ शकतो याविषयी जनजागृती केली.

पीएनपीच्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांसाठी स्वच्छता अभियानविषयी प्रदर्शन मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन सरपंच आरती पाटील यांच्या हस्ते तर शाश्वत स्वच्छता रॅलीचे सुरुवात नारळ वाढवून बी.बी. साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आली. विद्यार्थ्यांमार्फत गावामध्ये रॅली काढून फलकाच्या माध्यमातून आणि घोषणा देत स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

। रायगड टाइम्स ।

अलिबाग । समृध्द भारताच्या निर्माणामध्ये पहिले महत्वाचे पाऊल हे स्वच्छतेचे आहे. यासाठी आपण स्वत:बरोबर आपला गाव, आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. स्वच्छतेने मन प्रसन्न रहाते. या स्वच्छतारुपी सौंदर्याची आराधना करण्याची सवय सर्वांनी अंगिकारली पाहिजे, असे आवाहन जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता मिशन कक्ष उपमुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. साळुंखे यांनी केले.

क्रीडा संकुल वेश्वी - गोंधळपाडा समाज मंदीर येथील पटांगणात पीएनपी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, विशेष श्रमसंस्कार शिबीर कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी वेश्वीच्या सरपंच आरती पाटील, नंदकुमार कदम, माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, माजी उपसरपंच नरेश पडियार, तंटामुक्ती अध्यक्ष अरुण पाटील, पोलीस पाटील मानसी नमसुळे, कार्यक्रम समन्वयक जयवंत गायकवाड, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक इतर वेश्वी ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी उपस्थित होते.





शब्दांना सत्याची धार

# प्रहार

■ मंगळवार, ४ डिसेंबर २०१८ ■ RNI Reg.No. ■ वर्ष ११ ■ अंक ५५ ■ पाने १२ (ठाणे प्रहारसह) ■ ₹ ४.००

## एक पाऊल पुढे टाका, कचरा पेटीत कचरा टाका

### उपमुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. साळुंखे यांचे आवाहन

अलिबाग(प्रतिनिधी):



शाखेचे अध्यक्ष रामचंद्र मेस्त्री दिसत आहेत.

# पी.एन.पी. महाविद्यालयाने नोंदविले ऑनलाईन अभिप्राय; स्वच्छ सर्व्हेक्षण उपक्रम उत्साहात

**अलिबाग (प्रतिनिधी) :** स्वच्छ सर्व्हेक्षण (ग्रामीण) २०१८ अंतर्गत रायगड जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये ग्रामपंचायतींबरोबर महाविद्यालयामध्ये सुध्दा विविध उपक्रम होत आहेत. अलिबाग येथील पी.एन.पी. महाविद्यालयात स्वच्छ सर्व्हेक्षण (ग्रामीण) च्या ऑनलाईन प्रतिक्रिया नोंदविण्या संदर्भात स्वच्छ सर्व्हेक्षण २०१८ उपक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या संजीवनी नाईक होत्या.

यावेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले 'स्वच्छ भारत अभियान हा केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण व प्राधान्यक्रमाचा विषय आहे. अभियानामुळे गाव वाड्या, वस्त्या, स्वच्छ सुंदर झाल्या आहेत' मात्र आता नागरिकांनी सार्वजनिक स्वच्छतेला ही महत्व द्यावे. केंद्रीय कमिटी आकस्मिकपणे शाळा महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, व ग्रामपंचायत आदिंची पहाणी करणार असल्याने या ठिकाणी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन होणे आवश्यक आहे. युवकांनी मोबाईल ॲपवर सकारात्मक प्रतिक्रिया नोंदवून रायगड जिल्ह्याचे मानांकन वाढविण्यासाठी प्रयत्नशिल रहावे.

यावेळी संवादतज्ज्ञ सुरेश पाटील यांनी स्वच्छतेची शपथ दिली. कार्यक्रमास प्रा. रविंद्र पाटील, प्रा. नितीन अग्रवाल, डॉ. ओंकार पोटे, प्रा. तेजस म्हात्रे, प्रा. दिनेश पाटील, प्रा. रसिका मगदुम, आदि उपस्थित होते. प्रा. नम्रता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयात जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभियानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. स्वच्छ सर्व्हेक्षण (ग्रामीण) २०१८ ॲप डाऊनलोड करण्याबाबत प्रात्यक्षिकव्दारे संवाद साधला. यावेळी प्राचार्य निळकंठ शेरे अध्यक्षस्थानी होते. संवादतज्ज्ञ सुरेश पाटील व महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते.

## HIV AIDS Awareness (16 August 2018)




जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग
जिल्हा रुग्णालय रायगड



# Yuva Mahiti Doot (03 August 2018)





# विद्यार्थ्यांमार्फत योजना पोहोचवणार

## जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांची माहिती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

विविध शासकीय योजना तळागाळातील जनतेपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत पोहोचविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी दिली.

माहिती व जनसंपर्क महासंचनालय जिल्हा माहिती कार्यालय, रायगड शिक्षक व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफच्या विद्यमाने प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा माहिती दूत' यांच्यामार्फत एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा पीएनपी संकुलातील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. मिलिंद दुसाने बोलत होते. यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, मुंबई विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक डॉ. मधुकर बडगुजर, पीएनपी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, पीएनपी एमबीए महाविद्यालयाचे प्राचार्य अनुजकुमार मिश्रा, विभागीय समन्वयक मुंबई विद्यापीठ प्रा. रवींद्र पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता गुरव आदी उपस्थित होते. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १८ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने यांनी सांगितले की, राज्य सरकार आता विविध शासकीय योजना तळागाळातील जनतेपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत पोहोचविणार आहे. यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने युवा माहिती दूत हा उपक्रम हाती घेतला असून, राज्यभरातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील एक लाख युवकांमार्फत दोन कोटी जनतेपर्यंत पोहोचविण्याची तयारी केली आहे.

राज्यात सहा हजारांपेक्षा जास्त महाविद्यालये २३ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. त्यापैकी किमान एक लाख युवक या उपक्रमात सहभागी होतील, अशी सरकारची अपेक्षा आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांमध्ये एक मार्गदर्शक नेमण्यात येणार आहे. अध्यापक, ग्रंथपाल, अधीक्षक, क्रीडा शिक्षक यापैकी एकाची 'युवा माहिती दूत' मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात येणार आहे, राज्य सरकारने या योजनेसाठी विशेष मोबाईल अप्लीकेशनसुद्धा तयार केले आहे, असेही डॉ. दुसाने यांनी सांगितले.

चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, पीएनपी महाविद्यालयाची या कार्यक्रमासाठी निवड केल्याबद्दल शासनाचे आणि जिल्हा माहिती अधिकारी यांचे आभार व्यक्त केले, तसेच तरुण पिढीमार्फत अशा प्रकारच्या योजना ग्रामीण भागात पोहोचवणे गरजेचे आहे आणि पीएनपीच्या एन.एस.एस. विभागाचे कार्य मोलाचे आहे आणि अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी पीएनपीचे नेहमीच सहकार्य असेल, असे पाटील यांनी सांगितले.

माहिती व जनसंपर्क महासंचनालय, जिल्हा माहिती कार्यालय मार्फत मार्गदर्शन करताना डॉ. मिलिंद दुसाने. यावेळी चित्रलेखा पाटील, संजीवनी नाईक आदी उपस्थित होते. ( छायाचित्र : अमोल नाईक )





# International Disaster Management Day (13 August 2018)



# Anti-Plastic Campaign ( 08 September 2018)








REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA


हॉटेल
मातोश्री
Punjabi
Malvani
Seafood
जन शिक्षण संस्थान, रायगड
स्वच्छ भारत मिशन
आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस
ठिकाण :

# NSS Flag Hosting (24 September 2018)



# Blood Donation Camp ( 10 December 2019)








**Worlds AIDS Day Celebration ( 01 December 2019)**

# पथनाट्य स्पर्धेत केळुस्कर विद्यालय प्रथम

## ❑ एड्स जनजागृती सप्ताहानिमित्त आयोजन ❑ पीएनपी महाविद्यालय द्वितीयस्थानी

❑अलिबाग/प्रतिनिधी

जागतिक एड्स नियंत्रण दिन व जनजागृती सप्ताहनिमित्त मंगळवार (ता. ४) रोजी जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली येथे आयोजित पथनाट्य स्पर्धेत अलिबाग येथील चंद्रकांत हरी केळुसकर होमिओपॅथिक कॉलेजच्या संघाने प्रथम पारितोषिक, तर पीएनपी कॉलेज, वेश्वी यांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. जा. र. ह. कन्याशाळा, अलिबाग या संघाला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.



जागतिक एड्स नियंत्रण दिन व सप्ताहनिमित्त मंगळवारी (ता. ४) जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली येथे आयोजित पथनाट्य स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अजित गवळी, रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव जयदीप मोहिते, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा समनव्यक प्रा. डॉ. बाबासाहेब बिडवे, लायन्स क्लब श्रीबागचे अध्यक्ष विजय वनगे, पीएनपी कॉलेज प्राचार्य संजीवनी नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. गवळी यांनी एचआयव्ही प्रतिबंधाची उपस्थितांना शपथ दिली. त्यानंतर रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव जयदीप मोहिते (दिवाणी न्यायाधीश) यांनी तंबाखू विरोधी शपथ दिली. या स्पर्धेमध्ये पीएनपी कॉलेज वेश्वी, चं. ह. केळुसकर होमिओपॅथिक कॉलेज अलिबाग, जा. र. ह. कन्याशाळा, अलिबाग येथील विद्यार्थांनी सहभाग घेतला. तसेच यावेळी मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा समन्वयक प्रा. डॉ. बाबासाहेब बिडवे, हर्षद घरत, प्राचार्य संजीवनी नाईक यांनी मार्गदर्शन केले.

लायन्स क्लब श्रीबाग यांच्यावतीने विजेत्या संघांना चषक व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच पीएनपी कॉलेज वेश्वी यांस रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव जयदीप मोहिते (दिवाणी न्यायाधीश), निहा राऊत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.


भव्य रॅली


Get Tested
(Status)


Get Tested


महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग,
जिल्हा सामान्य रुग्णालय,
अलिबाग-रायगड.
Get Tested
आपली एच.आय.व्ही. तपासणी
करा व स्थिती (Status) जाणा.
KnowYourStatus
एच.आय.व्ही. तपासणी सरकारी/ महानगरपालिका
रुग्णालयात मोफत करण्यात येते.

**"Waves of Covid -19, Omicron And Covid 19 Vaccination ……**

**Where do we stand ???....." (21 January 2022)**








संमिश्र

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदु

# कोरोना ही शापित पर्वणी

## डॉ. चांदोरकर यांचे प्रतिपादन

▶ पीएनपी नाट्यगृहात 'कोव्हिड १९ : काल, आज आणि उद्या' चर्चासत्र संपन्न




(छायाचित्र: अमोल नाईक)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कोरोना ही शापित पर्वणी असल्याचे प्रतिपादन रोटरी क्लबचे अध्यक्ष बालरोग तज्ज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी केले आहे. पीएनपी वरिष्ठ महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग तथा रोटरी क्लब, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोव्हिड १९ : काल, आज आणि उद्या' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आपल्या मार्गदर्शनात डॉ.चांदोरकर यांनी कोरोना काळातील वैद्यकीय भूमिकेसंदर्भातही माहिती दिली. ते म्हणाले की, कोरोनाचा लहान वयोगटातील मुलांवर कमी प्रमाणात परिणाम झाला. कारण ते प्रमाण सौम्य होते. पण जर कोरोना रुग्ण वाढले तर त्या रुग्णासाठी अलिबागमध्ये हॉस्पिटल नव्हते. यामुळे परिस्थितीभावी या रुग्णांना मुंबईकडे रवाना करावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. याशिवाय कोरोनासंदर्भात ६० हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवा देत असंख्य रुग्णांना बरे केले असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. तर १५ ते १८ वयोगटातील मुलामुलांचे लसीकरण करण्यात येत असून, त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही डॉ.चांदोरकर यांनी केले आहे.

स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत वाजे यांनी प्रसूतीबाबत, प्रसूतीनंतर घेतलेली विशेष काळजी काळजी याबाबत विश्लेषण केले. तर गरोदर स्त्रियांमध्ये लस घ्यावी की नाही, हा संभ्रम होता. पण लस घ्यावीच असा आम्ही सर्व डॉक्टरांनी सल्ला दिला होता. लस घेतल्यामुळे अपत्यावर कोणताही परिणाम होत नसल्याचे त्यांनी पटवून दिले.

याशिवाय, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांनी कोरोनाचा लोकांच्या मानसिकतेवर कशा प्रकारे त्याचा परिणाम झाला हे नमूद केले. कोव्हिड फोबिया याबाबत माहिती देताना लोकांनी कोरोनासंदर्भातील संभ्रम दूर ठेवण्याचे आवाहन केले. तर कोरोनाचा प्रादूर्भाव पाहता तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची आवश्यकता हृदयरोग व मधुमेह तज्ज्ञ डॉ. सचिन जायभाई यांनी प्रतिपादीत केली. तसेच रक्तपेढी तज्ज्ञ डॉ.दीपक गोसावी यांनी सिटी व्हॅल्यूबाबत माहिती दिली.

पीएनपी नाट्यगृहात संपन्न झालेला हा कार्यक्रम कोव्हिड नियमांचे पालन करून फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून घेण्यात आला. या कार्यक्रमास रायगड आरोहेड लॅब सर्विसेस संचालक मंगेश रानवडे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, सत्राचे अध्यक्ष डॉ. ओमकार पोटे, प्रा. नम्रता पाटील, शेकापचे पुरोगामी युवा संघटनेचे अध्यक्ष विक्रांत वार्डे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र पाटील, प्रा. दिनेश पाटील तथा शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निवेदकाची जबाबदारी मंगेश रानवडे यांनी पार पाडली.

> आपले आरोग्य हे आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीवर आधारलेले आहे. कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत तणावग्रस्त अवस्थेमुळे प्रतिकारशक्तीचा शीण झाल्याने मृतकांची संख्या वाढली. त्यामुळे जरी टेस्ट पॉझिटिव्ह आली तरी न घाबरता आपण बरे होणारच, या इच्छाशक्तीच्या जोरावर कोरोनावर मात करा.
>
> - डॉ. अनिल डोंगरे, मानसोपचार तज्ज्ञ

# Mission Yuva Swasthya






# Award Distribution Ceremony







